# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 10 October 2024

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १० ऑक्टोबर २०२४ सायंकाळी ६.१०**

********

- सिडको महामंडळाला दिलेले भूखंड कब्जेहक्काने रुपांतरित करण्यास राज्य मंत्रिमंडळाची मान्यता
- जालना-नांदेड द्रुतगती महामार्ग तसंच लातूर जलसंपदा विभागाच्या विविध प्रकल्पांनाही मंजुरी
- ज्येष्ठ उद्योजक रतन टाटा यांच्या पार्थिव देहावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

आणि

- ६८ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या पार्श्वभूमीवर नागपुरात दीक्षाभूमीवर धम्मदीक्षा सोहळ्याला प्रारंभ

********

सिडको महामंडळाला दिलेले भूखंड कब्जेहक्काने रुपांतरित करण्यास राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. या निर्णयामुळे अनेक गृहनिर्माण संस्था या जागेच्या मालक होणार असून, त्यांना नाहरकत प्रमाणपत्र घेण्याची आवश्यकता राहणार नाही. नागरिकांच्या सोयीसाठी शासनाने हे भूखंड एकरकमी विहीत शुल्क आकारून भाडेपट्ट्यांऐवजी कब्जे हक्काने वाटप करण्याचा निर्णय घेतला आहे.

केंद्राची ॲग्रिस्टॅक योजना राज्यात राबवण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतला आहे. या योजनेंतर्गत माहिती निर्मिती कक्ष, शेतकरी माहिती संच, हंगामी पिकांचा माहिती संच आणि भूसंदर्भाकिंत भूभाग असणारे 'गाव नकाशे माहिती संच' महसूल विभाग तयार करेल. यासाठी सुकाणू समिती, अंमलबजावणी समिती, क्षेत्रीय

स्तरावर विभागस्तरीय, जिल्हास्तरीय समिती आणि तालुकास्तरीय समित्या स्थापन करण्यात येतील. पिकांच्या माहिती संचासाठी वार्षिक सुमारे ८१ कोटी ८३ लाख रुपये खर्च अपेक्षित आहे.

राज्यात छत्रपती संभाजीनगर, बीड, जालना, परभणी, धाराशिव, लातूर, नांदेड आणि हिंगोलीसह एकूण २१ जिल्ह्यांमध्ये नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचा दुसरा टप्पा राबवण्याचा निर्णय मंत्रिमंडळानं घेतला. यासाठी अंदाजित सहा हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोगास वैधानिक दर्जा देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या अध्यादेशाच्या प्रारूपास आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. हा अध्यादेश विधीमंडळाच्या आगामी अधिवेशनात सादर करण्यात येईल. या आयोगासाठी मंजूर असलेली अधिकारी, कर्मचाऱ्यांची २७ पदं आयोगाच्या आस्थापनेवर हस्तांतरीत करण्यासही मंत्रिमंडळानं मान्यता दिली आहे.

आपले सरकार सेवा केंद्र प्रकल्पासाठी केंद्रचालकांना ग्रामरोजगार सेवकांच्या धर्तीवर दरमहा दहा हजार रुपये मानधन ग्रामपंचायीतमार्फत देण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला.

हिंगोली जिल्ह्यातील वसमत येथील बाळासाहेब ठाकरे हळद संशोधन आणि प्रशिक्षण केंद्रासाठी ७०९ कोटी २७ लाख रुपयांचा अतिरिक्त निधी मंजूर करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. या केंद्रासाठी मंजूर अतिरीक्त निधी टप्पेनिहाय वितरीत करण्यात येणार आहे.
नागपूर मुंबई समृध्दी महामार्गाला जोडणाऱ्या जालना ते नांदेड द्रुतगती महामार्गाला या बैठकीत मंजुरी देण्यात आली.

लातूर जिल्ह्यासह राज्यात सावनेर, कणकवली, राजापूर, अंबरनाथ, जिहे कठापूर इथल्या विविध जलसंपदा प्रकल्पांच्या कामांना मंत्रिमंडळानं आज मान्यता दिली.

राज्यातील पत्रकार तसंच वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी दोन स्वतंत्र महामंडळं स्थापन करणं, राज्यातील रुग्णालयांमध्ये सुलभ शौचालय, स्नानगृह संकुल तसंच निवास सुविधा उपलब्ध करून देणं, अंगणवाड्यांमध्ये ३४५ पाळणाघरं सुरु करणं, तीन नव्या खासगी विद्यापीठांना मान्यता, नवीन महाविद्यालयं-नवीन अभ्यासक्रम तसंच अतिरिक्त तुकड्यांसाठी अर्ज करण्याला येत्या ३१ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ, महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये अधिनियमात सुधारणा, मराठवाड्यातील शाळांकरिता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेअंतर्गत निधी वाटप, शाळांना २० टक्के वाढीव अनुदानाचा टप्पा, मौलाना आझाद महामंडळाच्या भागभांडवलात वाढ, मदरशांमधील शिक्षकांच्या मानधनात वाढ, धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याच्या अधिनियमात सुधारणा, आदी निर्णयांना आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

****

ज्येष्ठ उद्योजक रतन टाटा यांच्या पार्थिव देहावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. देशाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक जडणघडणीत अमूल्य योगदान देणाऱ्या या थोर व्यक्तिमत्त्वाला वरळी इथल्या विद्युत दाहिनीत अखेरचा निरोप देण्यात आला. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी यावेळी केंद्र सरकारच्या वतीनं टाटा यांच्या पार्थिव देहाला पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहिली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, टाटा मोटर्सचे अध्यक्ष नटराजन चंद्रशेखरन् यांच्यासह उद्योग, चित्रपट, आणि राजकारणासह समाजाच्या सर्वच क्षेत्रातले मान्यवर यावेळी उपस्थित होते. मुंबई पोलिस दलाच्या वतीनं यावेळी शोकधून वाजवून तसंच हवेत बंदुकीच्या फैरी झाडत रतन टाटा यांना मानवंदना देण्यात आली.

त्यापूर्वी टाटा यांचा पार्थिव देह आज सकाळपासून मुंबईत सांस्कृतिक कला केंद्रात अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आला होता. टाटा समूहाच्या विविध कंपन्यांचे कर्मचारी, राजकीय नेते, सामाजिक क्षेत्रातल्या व्यक्ती यांच्यासह मोठ्या प्रमाणात सामान्य नागरिकांनी रतन टाटा यांचं अंत्यदर्शन घेऊन त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

रतन टाटा यांचं काल रात्री मुंबईत ब्रीच कॅण्डी रुग्णालयात निधन झालं, ते ८६ वर्षांचे होते.

****

रतन टाटा यांच्या निधनाबद्दल राज्यात आज एक दिवसांचा दुखवटा पाळण्यात आला, त्यामुळे नांदेड इथं होणारा राज्य सरकारचा महिला सक्षमीकरणाचा कार्यक्रम जिल्हा प्रशासनाने पुढे ढकलला आहे. या कार्यक्रमाबाबत नवीन तारीख, वेळ, स्थळ लवकरच जाहीर केलं जाईल, असं नांदेडचे जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी कळवलं आहे.

जालना जिल्ह्यात घनसावंगी तालुक्यातल्या कुंभारी पिंपळगाव इथं एका अन्नप्रक्रिया उद्योगाच्या दुसऱ्या टप्प्याचं भूमिपूजन आणि शेतकरी मेळावा आज मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आला होता. हा कार्यक्रमही स्थगित झाल्याचं, आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

दरम्यान, बीड जिल्ह्याच्या केज तालुक्यात खर्डा-चौसाळा-लोखंडी सावरगांव या रस्त्याच्या कामाचं भूमिपूजन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते उद्या सकाळी दूरदृष्य प्रणालीद्वारे होणार आहे.

****

६८ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त नागपुरात दीक्षाभूमी इथं आजपासून धम्मदीक्षा सोहळ्याला प्रारंभ झाला. हा धम्मदीक्षा सोहळा तीन दिवस चालणार आहे. आज डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे अध्यक्ष, आर्य भदंत सुरई ससाई यांच्या उपस्थितीत अनेक उपासक आणि श्रामणेर यांना धम्मदीक्षा देण्यात आली. दीक्षा घेणाऱ्या नागरिकांना बुद्ध वंदना, २१ प्रतिज्ञांचं पालन पठण करुन धम्मदीक्षा विधी पार पडला. दीक्षा घेण्यासाठी देशभरातून अनेक अनुयायी दीक्षाभूमीवर दाखल झाले आहेत.

धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त दक्षिण मध्य रेल्वेने नागपूर मार्गे नांदेड- अमला- नांदेड विशेष गाडी ची एक फेरी सोडण्याचा निर्णय घेतला आहे. ही विशेष गाडी नांदेड इथून उद्या शुक्रवारी ११ ऑक्टोबर रोजी रात्री ११ वाजता सुटेल आणि भोकर, हिमायतनगर, किनवट, आदिलाबाद, पिंपळकुटी, नागपूर मार्गे अमला इथं शनिवारी सकाळी ११ वाजता पोहोचेल. तर परतीच्या प्रवासात ही गाडी शनिवारी रात्री ८ वाजता अमला इथून सुटेल आणि आलेल्या मार्गे नांदेड इथं रविवारी सकाळी १० वाजून १५ मिनिटांनी पोहोचेल, असं दक्षिण मध्य रेल्वेनं कळवलं आहे.

****

आपली संस्कृती, मूल्य, मापदंड युवा पिढीसाठी वाचवायचे आहेत, त्यासाठी देशाचे सांस्कृतिक दूत होण्याचं आवाहन केंद्रीय सांस्कृतिक आणि पर्यटन मंत्री गजेंद्र सिंग शेखावत यांनी केलं आहे. मुंबई इथं आज डी.वाय.पाटील विद्यापीठात झालेल्या विकसित भारतासाठी युवा शक्ती या कार्यक्रमात ते बोलत होते. युवा पिढीने कोणत्याही क्षेत्रात काम केलं तरीही त्यांना देशाच्या प्रगतीचा धागा बनता आला पाहिजे, असं काम करण्याचं आवाहन शेखावत यांनी केलं.

****

लैंगिक शोषणाविरुद्ध शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांनी सतर्क राहून एकत्रित प्रयत्न करण्याची आवश्यकता अहिल्यानगरच्या प्रधान जिल्हा आणि सत्र न्यायाधीश अंजू शेंडे यांनी व्यक्त केली आहे. अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या शाळांमधील विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनाने झालेल्या एका कार्यशाळेत त्या आज बोलत होत्या. संवाद हा फक्त बोलण्यातून नव्हे तर वागण्यातून आणि हावभावातून जाणवत असल्याकडे न्यायाधीश शेंडे यांनी लक्ष वेधलं.

****

शारदीय नवरात्र महोत्सवानिमित्त आज आठव्या माळेला धाराशिव जिल्ह्यातल्या तुळजापूर इथल्या श्री तुळजाभवानी देवीची भवानी तलवार अलंकार महापूजा मांडण्यात आली. छत्रपती श्री शिवाजी महाराज यांना धर्म रक्षणासाठी तुळजाभवानी मातेने प्रसन्न होऊन भवानी तलवार देऊन आशीर्वाद दिला, अशी आख्यायिका यामागे सांगितली जाते. दरम्यान, उद्या ११ ऑक्टोबर रोजी श्री तुळजाभवानी देवीची महिषासूर मर्दिनी अलंकार महापूजा मांडण्यात येणार आहे.

****

छत्रपती संभाजीनगर परिमंडलातल्या प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत सहभागी झालेल्या चार  हजार ३३४ घरगुती ग्राहकांचं मासिक वीजबिल शून्य होणार आहे. घराच्या छतावर एक ते तीन किलोवॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पाद्वारे घरगुती ग्राहकांना दरमहा सुमारे  १२० ते ३६० युनिट वीज मोफत मिळू शकते. या सौर ऊर्जा प्रकल्पासाठी केंद्र सरकारकडून घरगुती वीज ग्राहकांना एक किलोवॅटसाठी ३० हजार रुपये, दोन किलोवॅटसाठी ६० हजार रुपये आणि तीन किलोवॅट आणि त्यापेक्षा जास्त क्षमतेसाठी कमाल ७८ हजार रुपये अनुदान थेट मिळत असल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

दरम्यान, राज्यातील महानिर्मिती, महापारेषण आणि महावितरण या तिन्ही शासकीय वीज कंपन्यांतील कर्मचाऱ्यांना आचारसंहिता लागू होण्यापूर्वी सानुग्रह अनुदान जाहीर करा, अशी आग्रही मागणी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ अधिकारी संघटनेनं केली आहे.

****

बीड जिल्ह्यात जिल्हा उद्योग केंद्र आणि महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राच्या वतीने सुशिक्षित बेरोजगार युवक युवतींसाठी मोफत विविध प्रशिक्षण कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. इच्छुकांनी जिल्हा उद्योग केंद्राशी संपर्क साधण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

****

धुळे जिल्ह्यातल्या गोताणे तालुक्यातल्या चार पाझर तलावांची नुकतीच दुरुस्ती करण्यात आली आहे. या पाझर तलावांमुळे गोताणे, उडाणे, आनंदखेडे इथल्या शेतकऱ्यांच्या सुमारे ६५० एकर शेतीला सिंचनाचा लाभ होणार आहे. आज आमदार कुणाल पाटील यांच्या हस्ते या तलावाचं जलपूजन करण्यात आलं.

****

येत्या २४ तासात राज्यातल्या बहुतांश जिल्ह्यात तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. मराठवाड्यात परभणी, बीड, धाराशिव जिल्ह्यातही येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

****